**Sol.** राजकोषातील जमेचे दोन प्रकार असतात महसुली जमा आणि भांडवली जमा. महसुली जमेत कर, व्याज, नफा, लाभांश यांचा समावेश होतो. भांडवली जमेत शासनाला मिळालेले कर्ज, कर्ज परतफेड किंवा मुद्दल, लिलाव/ निर्गुंतवणुकीतून मिळालेले भांडवल, शासनाने घेतलेली अंतर्गत बाजार कर्जे, परकीय कर्जे यांचा समावेश होतो. म्हणून क आणि इ येणार नाही. योग्य पर्याय (d)

**S6. Ans.(b)**

**Sol.** A- 1947 मध्ये स्वातंत्र्य मिळाले तेव्हा भारत अन्नधान्यासाठी इतर देशांवर बऱ्याच प्रमाणात अवलंबून होता. नंतरच्या काळात हरितक्रांती मुळे देश स्वयंपूर्ण झाला आणि आयातीमधील अन्नधान्याचा वाटा कमी होत गेला. म्हणून विधान A अयोग्य.

B- जागतिक वस्तू निर्यातीत भारताचा वाटा ३ टक्क्याच्या आसपास आहे तर जागतिक सेवा निर्यातीत भारताचा वाटा 1-2% च्या आसपास आहे.

म्हणून पर्याय (b) योग्य

**S7. Ans.(a)**

**Sol.** 1991 मध्ये करण्यात आलेल्या सुधारणांचे भारतीय अर्थव्यवस्थेवर सकारत्मक आणि नकारात्मक परिणाम झाले.
सकारात्मक परिणाम - राष्ट्रीय स्थूल उत्पादनात वाढ, महागाईत घट, राजकोषीय तुटीत घट, औद्योगिक उत्पादनात वाढ.
नकारात्मक परिणाम - रोजगार रहित वाढ, सामाजिक क्षेत्रात कमी गुंतवणूक, कृषी क्षेत्राचा घटता वाटा, असंघटित क्षेत्र उत्पादनाकडे दुर्लक्ष

**S8. Ans.(c)**

**Sol.** ज्यांना काम करायची इच्छा आणि क्षमता आहे अशांचाच विचार बेरोजगारी मोजताना केला जातो. बालक आणि वृद्ध वयोगटातील लोकसंख्येची क्षमता काम करण्याजोगी मानली जात नाही तसेच ज्यांना काम करायची इच्छा नाही त्यांचाही समावेश या गटात होत नाही.

**S9. Ans.(b)**

**Sol.** 2020मध्ये केंद्र शासनाने मिशन कर्मयोगी या राष्ट्रीय कार्यक्रमाची सुरुवात केली. शासनाच्या नोकरशाहीत सुधारणा करणे हा याचा प्रमुख उद्देश आहे. याच्या अंमलबजावणी साठी 2013 कंपनी कायद्या अंतर्गत एक कंपनी स्थापन करण्यात अली आहे. हि कंपन i - GOT हे ऑनलाईन प्रशिक्षण केंद्र हाताळेल.

**S10. Ans.(c)**

**Sol.** 1867मधील 'दास कॅपिटल' या ग्रंथामध्ये भांडवलशाही अर्थव्यवस्थेबद्दल कार्ल मार्क्स या अर्थशास्त्रज्ञाने टीका मांडून या व्यवस्थेमध्ये कामगारांचे कसे शोषण होते ते दाखवून दिले.

**S11. Ans.(c)**

**Sol.** मिश्र अर्थव्यवस्था हि भांडवली आणि समाजवादी व्यवस्थेचा सुवर्णमध्य आहे. यामध्ये खासगी आणि सार्वजनिक क्षेत्राचे सहअस्तित्व असते. काही क्षेत्र शासनाने राखीव ठेवलेली असतात. परंतु त्यामध्ये नफा मिळवायचाच नाही असे उद्दिष्ट नसते. मूलभूत गरज सहज उपलब्ध व्हाव्या अशा उद्देशाने शासन कार्य करते.

**S12. Ans.(d)**

**Sol.** भारतामध्ये मोठ्या प्रमाणावर बेरोजगारी आढळते कारण लोकसंख्या मोठी आहे. त्यात तरुणांची संख्या जास्त आहे. तरुण वर्ग सुशि क्षित झाला तरी काम करण्यासाठीचे कौशल्य शिक्षण व्यवस्थेत विकसित होत नाही. त्यामुळे शहरात मोठी बेरोजगारी निर्माण होते. ग्रामीण भागात स्थानिक उद्योगांचा ऱ्हास झाल्याने संधींची उपलब्धताच नाही. असलेल्या शेतीत अनेक वाटेकरी झाल्यामुळे शेतीतून येणाऱ्या उत्पन्नावर परिणाम होतोय म्हणून तिथेही पुरेसा रोजगार नाही.

**S13. Ans.(c)**

**Sol.** विकास निर्देशांकाचा आधार घेऊन असमानता – समायोजित मानव विकास निर्देशांक 2010 काढला जातो. त्याचे मूल्य HDI पेक्षा जितके कमी तितकी असमानता जास्त. शून्य असमानता असताना दोनी निर्देशांक सारखे असतात.

**S14. Ans.(b)**

**Sol.** सहस्त्रक उद्धिष्टांच्या पुढचे पाऊल म्हणजे शाश्वत विकास उद्दिष्ट. 2015 मध्ये शाश्वत विकास उद्दिष्टे पुढी 15 वर्षांच्या कालावधीसाठी स्वीकारण्यात आली. हि उद्दिष्टे महत्वाची असली तरी कायदेशीर रित्या बंधनकारक नाहीत.
म्हणून C आणि D चूक.

**S15. Ans.(d)**

**Sol.** आठव्या पंचवार्षिक योजनेचा काळ म्हणजे 1992 ते 1997. या काळात भारतामध्ये आर्थिक , राजकीय क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर बदल घडून आले. बदलत्या आर्थिक गरज पूर्ण करण्यासाठी 1996 मध्ये NSDL ची स्थापना झाली.

स्थानिक स्वराज्य संस्थांना कायदेशीर दर्जा देण्यासाठी 1993 मध्ये घटना दुरुस्ती करण्यात आली. याचसोबत खासदारांवर अधिक जबाबदारी म्हणून 1993 मध्ये MPLADS कार्यक्रम सुरु झाला.

**S16. Ans.(b)**

**Sol.** महाराष्ट्राच्या भोवती एकूण 6 राज्य आणि 1 केंद्रशासित प्रदेश आहेत.

पूर्वेकडे - छत्तीसगढ

उत्तरेकडे - मध्य प्रदेश

दक्षिण - गोवा, कर्नाटक

आग्नेय - तेलंगणा

वायव्येस - गुजरात आणि केंद्रशासित प्रदेश दादरा नगर हवेली

**S17. Ans.(b)**

**Sol.** महाराष्ट्राला लागून असलेल्या राज्यांपैकी मध्यप्रदेश राज्याला सर्वाधिक जिल्हे लागून आहेत. ते म्हणजे नंदुरबार, धुळे, जळगाव, बुलढाणा, अमरावती, नागपूर, भंडारा, गोंदिया.

**S18. Ans.(c)**

**Sol.** पंढरपूर तालुका सोलापूर जिल्ह्यात, तुळजापूर तालुका उस्मानाबाद जिल्हात तर निलंगा तालुका लातूर जिल्ह्यात आहे. पश्चिमे कसून पूर्वेकडे जिल्हे सोलापूर, उस्मानाबाद आणि लातूर या क्रमाने येतात म्हणून योग्य पर्याय ३.

**S19. Ans.(d)**

**Sol.** लाव्हारसापासून दख्खन पठाराची निर्मिती झाली. त्याचा पश्चिमेकडील भाग खचून कोकण किनारपट्टीची निर्मिती झाली. उल्हास नदीच्या खोऱ्यात किनारपट्टीची रुंदी सर्वाधिक आहे तर दक्षिणेकडे हि रुंदी कमी होत जाते. किनारपट्टी वरून अनेक नद्या समुद्राकडे वाहत जातात त्यामुळे किनारपट्टी सलग नाही म्हणजेच रिया प्रकारची आहे. या किनारपट्टी पैकी सर्वाधिक लांबी रत्नागिरी जिल्ह्यात आहे तर मुंबई शहरास सर्वात कमी लांबीची किनारपट्टी आहे. म्हणून दिलेली सगळी विधाने योग्य आहेत.

**S20. Ans.(d)**

**Sol.** महाराष्ट्रात सह्याद्री पर्वतातत‌सेच पठारावर अनेक शिखरे आहेत. यापैकी सर्वात उंच शिखर कळसुबाई अहमदनगर जिल्ह्यात आहे.

प्रश्नामधील शिखरे हनुमान - धुळे , तौला नाशिक जिल्ह्यात आहे. वैराट हे शिखर अमरावती जिल्ह्यात आहे म्हणून पर्याय (d) योग्य.




**S21. Ans.(d)**

**Sol.** वरीलपैकी सिंदफणा नदीचा उगम बीड जिल्ह्यात तर पैनगंगा नदीचा उगम अजिंठा डोंगर रांगात होतो. तापी, नर्मदा, वैनगंगा मध्य प्रदेशात उगम पावतात तर इंद्रवतो नदी ओडिशात उगम पावते.

**S22. Ans.(c)**

**Sol.** सह्याद्री पर्वत ओलांडण्यासाठी विविध घाटमार्ग आहेत.

आंबोली : सावंतवाडी - बेळगाव

माळशेज : ठाणे - नगर

वरंधा : महाड - पुणे

कुंभार्ली : चिपळूण - कराड

**S23. Ans.(d)**

**Sol.** महाराष्ट्रातील पावसाचे वितरण असमान आहे. इथे प्रामुख्याने नैऋत्य मोसमी वाऱ्यापासून पाऊस पडतो. ईशान्य मोसमी वाऱ्यांचा पाऊस केवळ पूर्व पठारी प्रदेशात ऑक्टोबर ते जानेवारी या कालावधीत पडतो. नैऋत्येकडून येणारे वारे सहयाद्रीच्या पश्चिमेकडे अडविले गेल्याने तिथे प्रतिरोध पर्जन्य असतो तर पश्चिमेकडे बराच पाऊस झाल्याने सह्याद्रीच्या पूर्वेकडे येणाऱ्या वाऱ्यात बाष्प कमी राहते त्यामुळे पूर्व उतारावर अत्यंत कमी वृष्टी होते. म्हणून तिनही विधाने योग्य.

**S24. Ans.(b)**

**Sol.** खडकवासला प्रकल्प मुठा नदीवर 1880 साली, येलदरी पुर्णा नदीवर 1968 मध्ये, भंडारदारा प्रवरा नदीवर 1926 मध्ये तर धोम कृष्णा नदीवर 1977साली बांधण्यात आला.

**S25. Ans.(b)**

**Sol.** धाराशीवची लेणी उस्मानाबाद शहराजवळ वसलेली आहेत. याची बांधणी इ. स. 5 ते 7 च्या दरम्यान झाली. इथे बौद्ध आणि जैन अशा दोन्ही प्रकारच्या लेण्या आहेत.

**S26. Ans.(c)**

**Sol.** जिल्हा - लिंगगुणोत्तर

बीड - 916

सिंधुदुर्ग - 1036

मुंबई शहर - 832

भंडारा - 982

**S27. Ans.(d)**

**Sol.** हिमालयातील पर्वतरांगांचा क्रम दक्षिणेकडून उत्तरेकडे शिवालिक - धौलधर - पिरपंजाल - झास्कर - लडाख -काराकोरम असा आहे.

**S28. Ans.(a)**

**Sol.** काझीरंगा अभयारण्य आसाम राज्यात आहे. याला जागतिक वारसा स्थळाचा दर्जा असून भारतीय एक शिंगी गेंडे इथे मोठ्या प्रमाणात आढळतात.

**S29. Ans.(b)**

**Sol.** वरीलपैकी खिल्लारी हि गायीची प्रजाती आहे तर जर्सी हि भारतीय प्रजाती नाही. पर्याय B आणि C योग्य

**S30. Ans.(c)**

**Sol.** जगात अनेक ठिकाणी स्थलांतरित शेती केली जाते त्याला पारंपरिक नावे आहेत. जसे कि

चेना - श्रीलंका

रोका - ब्राझील

तामराई - थायलंड

लडांग - इंडोनेशिया

काईजींन - फिलिपिन्स

तौनग्या - म्यानमार

कोनुको - व्हेनेझुएला इत्यादी

भारतात स्थलांतरित शेतीला झूम म्हटले जाते.

**S31. Ans.(b)**

**Sol.** रस्त गोफर हे गुजराथी पाक्षिक दादाभाई नौरोजी यांनी 1851 मध्ये मुंबई प्रांतात सुरु केले. इंग्रजी आणि गुजराती भाषेत हे पाक्षिक होते.

**S32. Ans.(b)**

**Sol.** बेहरामजी मलबारी हे 19 व्या शतकातील महत्वाचे समाज सुधारक होते. 1890च्या सुमारास मुलीच्या संमती वयाचा विषयाचा त्यांनी पाठपुरावा केल्यामुळे 1891 मध्ये संमती वयाचा कायदा पारित करण्यात आला.

**S33. Ans.(b)**

**Sol.** 1829 ते 1839 या काळात कोल उठाव छोटा नागपूर पठार परिसरात होत राहिले. ब्रिटिशांनी फौजदारी कारवाई करून हे उठाव चिरडून टाकले यात या उठावाचा नेता बुद्धो भागात याचा मृत्यू झाला.

इतर पर्याय - त्यांचे उठाव

दुर्जन सिंग - चूआर उठाव

बिसरा मुंडा - मुंडा उठाव

तिरथ सिंग - खासी उठाव

**S34. Ans.(c)**

**Sol.** 1881 साली महात्मा ज्योतिराव फुले यांनी हे पुस्तक लिहिले. धार्मिक, राजकीय, सामाजिक बंधनांमुळे शेतकऱ्यांची कशी पिळवणूक होते याचे चित्र यात मांडले आहे.

**S35. Ans.(b)**

**Sol.** ब्रिटीश काळात सारा लागू आणि गोळा करण्याच्या तीन महत्वाच्या पद्धती राबविल्या गेल्या.

जमीनदारी पद्धत बंगाल, बिहार, ओरिसा प्रांतात 1793 मध्ये कॉर्नवॉलिस ने लागू केली.

रयतवारी पद्धत थॉमस मुनरो याने प्रामुख्याने मद्रास आणि बॉम्बे तसेच कूर्ग आणि आसामच्या काही प्रदेशात राबविली.

महालवारी पद्धत प्रामुख्याने पंजाब, आग्रा, वायव्य सरहद्द प्रदेशात 1822 पासून राबविली गेली.

**S36. Ans.(a)**

**Sol.** 1942च्या आंदोलन काळात महाराष्ट्रात सातारा जिल्ह्यात क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली प्रति सरकार स्थापन करण्यात आले. हे सरकार 'पत्रीसरकार, म्हणून ओळखले जात असे.

**S37. Ans.(b)**

**Sol.** 1909मध्ये भारतमंत्री लॉर्ड मोर्ले होते तर व्हाइसरॉय मिंटो होते. या दोघांच्या नावाने नवीन सुधारणा आणल्या ज्यात भारतीयांना शासनात समाविष्ट केले परंतु निवडून येणाऱ्यांचे बहुमत नव्हते. त्यामुळे सुधारणा नावालाच होत्या. भारतातील असंतोष शांत करण्यासाठी या सुधारणा आणल्या त्याला उद्देशून लॉर्ड मोर्ले यांनी वरील उद्गार काढले.

**S38. Ans.(c)**

**Sol.** संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव 1929 च्या लाहोर अधिवेशनात पारित झाला तर 1931 मध्ये सरदार वल्लभ भाई पटेल यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या अधिवेशनात मूलभूत हक्क आणि राष्ट्रीय आर्थिक कार्यक्रम हे महत्वपूर्ण ठराव पारित झाले.

**S39. Ans.(d)**

**Sol.** मुंबईमध्ये सेवा सदन ची स्थापना बेहरामजी मलबारी यांनी केली तर पुण्यात रमाबाई रानडे यांनी केली. पंडित रमाबाई यांनी पुण्यात आर्य महिला समाजाची स्थापना केली.

**S40. Ans.(d)**

**Sol.** ईश्वरचंद्र वियासागर यांनी विधवा पुनर्विवाह बाबत जनजागृतीसाठी बरेच प्रयत्न केले. त्याला कायदेशीर स्वरूप येण्यासाठी कंपनी कडे पाठपुरावा केला त्याचे फलित म्हणजे विधवा पुनर्विवाह कायदा 1956. कंपनीची सत्ता संस्थांच्या अंतर्गत कारभारात चालत नव्हती. परंतु संस्थांतील प्रजेत सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी शाहू महाराजांनी जे प्रयत्न केले त्यातला एक म्हणजे 1917 चा कायदा. तीनही विधाने योग्य

**S41. Ans.(c)**

**Sol.** द मोहम्मदन लिटररी सोसायटी अब्दुल लतीफ यांनी 1863 मध्ये कलकत्ता येथे स्थापन केली. तरुण मुस्लिमांना इंग्रजीतून शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहित करणे हा सोसायटीचा उद्देश होता.

**S42. Ans.(d)**

**Sol.** सचिंद्रनाथ सन्याल हे क्रांतिकारी चळवळी मधील महत्वाचे नेते होते. त्यांनी बंदी जीवन हे त्यांचे आत्मवृत्त लिहिले.

**S43. Ans.(d)**

**Sol.** डॉ. आंबेडकरांनी आपल्या लिखाणातून भोवतालच्या परिस्थितीचा परामर्श घेतला त्यांचे पुस्तक भारतातील जातीव्यवस्था (कास्ट्स इन इंडिया) 1916 मध्ये , जातींचे समूळ उच्चाटन (annihiliation of castes) 1936 मध्ये , रानडे, गांधी आणि जीना 1943 मध्ये तर थॉट्स ऑन पाकिस्तान 1941 मध्ये प्रसिद्ध झाले.



**S44. Ans.(b)**

**Sol.** बाबा पदमनजी यांच्यावर शिक्षण घेताना क्रिस्टी धर्माचा प्रभाव पडला त्यांनी ख्रिश्चन धर्म स्वीकारून पुढे सुधारणांसाठी तसेच मराठीतून क्रिस्ती धर्मासाठी त्यांनी लिखाण केले.

**S45. Ans.(a)**

**Sol.** सुभाषचंद्र बोस यांनी काँग्रेसमधून बाहेर पडून फॉरवर्ड ब्लॉक नावाची संघटना स्थापन केली. नंतर कैदेतून पलायन करून ते जर्मनीला पोहोचले. नंतर जपानला जाऊन त्यांनी आझाद हिंद फौजेची बांधणी केली. त्यांनी भारताच्या हंगामी सरकारची स्थापना करून जपानच्या समवेत भारताकडे कूच करायचे ठरविले. यानंतर दुसऱ्या महायुद्धाचा भाग म्हणून जपान ने 1945 मध्ये अंदमान निकोबार जिंकून घेतले.

**S46. Ans.(d)**

**Sol.** pH म्हणजेच सामू हा पदार्थातील हायड्रोजन आयनांच्या संख्येवर अवलंबून असतो. शरीराचा सामू संतुलित राहणं आवश्यक असते नाहीतर ऍसिडिटी चा त्रास उद्भवतो. हा सामू 7.35 ते 7. 45 च्या दरम्यान असतो. तो संतुलित राहावा म्हणून चिंचेसोबत वरणात गूळ घालतात.

पावसाच्या पाण्याचा सामू 7 पेक्षा कमी असेल तर त्याला आम्लवर्षा म्हणतात. त्याचा झाडांवर त्याचा विपरीत परिणाम होतो.

**S47. Ans.(b)**

**Sol.** मायका हे विजेचे दुर्वाहक पण उष्णतेचे सुवाहक असल्यामुळे झटका न लागता इस्त्री गरम होऊ शकते. मायका हा चकचकीत अधातू आहे.

**S48. Ans.(a)**

**Sol.** दुरदृष्टिता या आजारात डोळ्यांनी लांबच्या वस्तू दिसतात पण जवळच्या वस्तू दिसायला त्रास होतो. बहिर्वक्र भिंगाच्या चष्म्याने हा दोष दूर केला जातो.

**S49. Ans.(c)**

**Sol.** एका माध्यमातून दुसऱ्या माध्यमात प्रवास करताना प्रकाशाच्या किरणांची दिशा बदलते,यालाच प्रकाशाचे अपवर्तन म्हणतात. यामुळे वस्तू जशा आहेत त्यापेक्षा वेगळया डोळ्यांना भासतात.

ताऱ्यांपासून निघणारा प्रकाश दाट - विरळ माध्यमातून आपल्यापर्यंत पोहोचतो. किरण दिशा बदलत येत असल्याने दिसताना प्रकाश कमी जास्त होत राहतो. त्यामुळे तारे लुकलुकतात असे भासते.

याप्रमाणेच पाण्याची बाटले किंवा तलावातले पाण्यात प्रकाश शिरताना किरणांची दिशा बदलते त्यामुळे तळ वरती आल्यासारखा भासतो, बाटलीच्या पलीकडील वस्तू मोठ्या दिसतात.

**S50. Ans.(c)**

**Sol.** मनुष्यात 4 कप्प्यांचे हृदय असते. शीत रक्ताच्या प्राण्यांमध्ये 3 कप्प्यांचे हृदय असते जसे कि मगर आणि सरीसृप.

2 कप्प्यांचे हृदय माश्यात आढळते.

**S51. Ans.(d)**

**Sol.** संप्रेरकाचे शरीरातील परिणाम संथ पण कायमस्वरूपी असतात. जसे कि सुरवंटाचे फुलपाखरू होणे, टॅडपोल चा बेडूक होणे, दाढी- मिशी येणे. संप्रेरके जीवनक्रियांवर नियंत्रण देखील ठेवतात जसे रक्तातील साखर वाढली असता इंशुलीन जास्त प्रमाणात स्त्रवते आणि साखरेचे प्रमाण नियंत्रित करते.

**S52. Ans.(b)**

**Sol.** ऑक्सिटोसिन हे संप्रेरक प्रसूतीच्या महत्वाचे असते. ऍड्रेनलीन रागावर नियंत्रण ठेवण्यात मदत करते. जिब्बार्लीन वनस्पतींच्या वाढीस मदत करते तर टेस्टोटोरॉन पुरुषांमध्ये आढळते.

**S53. Ans.(a)**

**Sol.** जीवनसत्व ड कमी पडल्यामुळे शरीरातील हाडे मऊ होऊन वेदना होतात यालाच मुडदूस म्हणतात. कॅल्शियम व फॉस्फरस शरीराला अन्नातून मिळवून देण्यासाठी जीवनसत्व ड आवश्यक असते.

**S54. Ans.(b)**

**Sol.** टायफॉईड आणि क्षय हे जिवाणूजन्य रोग आहेत. पोलिओ या रोगात विषाणू चेतासंस्थेवर हल्ला करतात. हेपाटीटीस बद्दल दिलेले तीनही विधाने लागू आहेत.

**S55. Ans.(b)**

**Sol.** संघ मोलुस्का मधील बहुसंख्य प्राणी जलचर असतात. त्यांचे शरीर अखंडित, मऊ, त्रिस्तरीय असते. वरीलपैकी तारामास सोडून इतर सर्व प्राणी या गटात मोडतात. तारामासा इकायनोडर्माटा संघाचा सदस्य आहे.

**S56. Ans.(c)**

**Sol.** पेशींमधील अंगके विशिष्ट कामे करतात यापैकी तंतूकणिकांमध्ये ATP स्वरूपात ऊर्जा तयार होते म्हणून त्यांना वीजनिर्मिती केंद्र म्हणतात. संश्लेषित झालेली प्रथिने बांधून पुढे पाठवण्याचे काम गॉलगी संकुल करते. पेशीत तयार आलेली टाकाऊ पदार्थांचे तसेच पेशींवर होणाऱ्या परकीय हल्ल्यांचे विघटन करण्याचे काम लायकारिक करतात. पेशी जुनी होते किंवा फुटते तेव्हा त्या पेशींचेही विघटन करतात म्हणून त्यांना आत्मघाती पिशव्या म्हणतात. पेशींना विशिष्ट रंग द्यायचे काम लावले करतात.

**S57. Ans.(b)**

**Sol.** यकृतामधून पचनासाठी स्रवला जाणारा रस हा आम्लारी प्रकारचा असतो. अन्नाला आम्लारी बनवून त्यातील मोठ्या मेदांचे तो छोट्या मेदात रूपांतर करतो.

**S58. Ans.(b)**

**Sol.** चुनखडी हा अधातू आहे

पितळ - तांबं + जस्त

गन मेटल - टिन + जस्त

**S59. Ans.(c)**

**Sol.** अणूची रचना समजून घेण्याचे प्रयत्न वरीलपैकी चारही शास्त्रज्ञांनी केले. त्यातील रुदरफोर्ड ने सोन्याच्या पत्र्यावर अल्फा कणांचा मारा करून अणूचे केंद्रक आणि त्याभोवती फिरणारे इलेक्ट्रॉन अशी रचना मांडली.

**S60. Ans.(c)**

**Sol.** आयोडीन चे सर्वाधिक प्रमाण मासे वा समुद्रातील जीवांमध्ये असते.

**S61. Ans.(c)**

**Sol.** ज्ञानपीठ पुरस्कार भारतात साहित्यातील सर्वोच्च पुरस्कार आहे. 1965 पासून याची सुरुवात झाली. राज्यघटनेमधील 22 भाषांसाठी हा दिला जातो

**S62. Ans.(c)**

**Sol.** 2019 मधील नोबेल पुरस्कार विजेते प्रश्नात दिले आहेत. नोबेल पुरस्कार हा 1901 पासून सध्या 6 क्षेत्रांसाठी हा पुरस्कार देतात. भौतिक, रासायान, औषध किंवा शरीरशास्त्र, साहित्य, शांतता, अर्थशास्त्र.

**S63. Ans.(c)**

**Sol.** दिल्लीच्या पहिल्या महिला मुख्यमंत्री सुषमा स्वराज होत्या. त्यामुळे पर्याय A आणि C चूक. आनंदीबेन पटेल या उत्तर प्रदेशच्या राज्यपाल झाल्या. त्यामुळे D चूक.

**S64. Ans.(b)**

**Sol.** परामर्श म्हणजे आढावा घेणे, विश्लेषण करणे. नॅक चे निकष का मिळवता आले नाही ते शोधून अडथळे दूर करण्याच्या प्रयत्नासाठी हि योजना 2019 मध्ये सुरु केली.

**S65. Ans.(b)**

**Sol.** गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली येथे असून 2011 मध्ये त्याची स्थापना झाली. मोठ्या मेहनतीने महाराष्ट्राने पारित केलेला जादूटोणा प्रतिबंध कायदा अभ्यासायला घेणारे ते पहिलेच विद्यापीठ आहे.

**S66. Ans.(a)**

**Sol.** 2019 मधल्या सुरक्षित शहर निर्देशांक यादीत मुंबई शहर 45 व्या स्थानावर आहे तर दिल्ली शहर ५२ व्या स्थानावर आहे.

**S67. Ans.(c)**

**Sol.** कपिल देव हे भारताचे महान क्रिकेट खेळाडू आहेत. निवृत्ती नंतर ते CCI चे नाही तर राष्ट्रीय क्रिकेट अकादमीचे अध्यक्ष होते. काही काळापूर्वी त्यांची हरियाणाच्या क्रीडा विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून नियुक्ती झाली आहे.

**S68. Ans.(d)**

**Sol.** देशांनी शाश्वत विकास ध्येय साध्य करावी त्यासाठी जनतेला सहभाई करून घ्यावे म्हणून जनतेवर प्रभाव टाकणाऱ्या व्यक्तींना सदिच्छा दूत म्हणून नेमले जाते. गेल्या काही काळात दिया मिर्झा यांनी स्वतःहून पर्यावरण जनजागृती सती प्रयत्न केलेले आहेत.

**S69. Ans.(c)**

**Sol.** अमेरिका आणि आशियातील तीन देश भारत जपान फिलिपिन्स यांनी हा नौदल सराव दक्षिण चिनी समुद्रात पार पाडला. या प्रदेशात चीन दाखवत असलेल्या अवास्तव वर्चस्वाला सांकेतिक छेद देण्यासाठी असा सर्व केला असेही मानले जाते.

**S70. Ans.(a)**

**Sol.** प्लास्मा संशोधन संथ एक स्वायत्त संस्था आहे. तिची स्थापना 1986 साली अहमदाबादमध्ये झाली.

**S71. Ans.(d)**

**Sol.** एकही विधान सत्य नाही. आंध्र प्रदेश राज्याने विशाखापट्टणम, कुर्नुल आणि अमरावती या तीन शहरात राजधान्या निर्माण करण्याचा निर्णय घेतला आणि आरिफ मोहम्मद खान हे केरळचे राज्यपाल झाले.



**S72. Ans.(d)**

**Sol.** उत्तर प्रदेशातून राज्यसभेवर सर्वाधिक म्हणजे 31 खासदार पाठवले जातात त्यानंतर 19 जागांसह महाराष्ट्राचा क्रमांक आहे. राज्यसभेचे कामकाज 1952 मध्ये सुरु झाल्यापासून 250th अधिवेशन 2019 मध्ये भरल. याप्रसंगी विशिष्ट नाणी हि प्रसारित करण्यात आली.

**S73. Ans.(a)**

**Sol.** इंदिरा गांधी शांतता पुरस्कार 1986 पासून दरवर्षी दिला जातो. आंतरराष्ट्रीय शांतते साठी प्रयत्न करणायांना प्रोत्साहन म्हणून हा पुरस्कार देतात.

**S74. Ans.(b)**

**Sol.** अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्षपद महत्वाचे मानले जाते. त्यासाठी बरीच चढाओढ असते. 2019 च्या संमेलनासाठी ज्येष्ठ दिग्दर्शक जब्बर पटेल यांची निवड झाली. 2019 चे संमेलन 2020 पर्यंत पुढे गेले.

**S75. Ans.(c)**

**Sol.** भारत अण्वस्त्रधारी देशांच्या गटात सामील झाला याची आठवण म्हणून हा दिवस साजरा करतात. जागतिक बलाढ्य देशांचा विरोध पत्करून भारताने त्यावेळी ऑपरेशन शक्ती नावाने अणुचाचणी घेतली होती.

**S76. Ans.(a)**

**Sol.** भारतीय राज्यघटना हि कोलाज आहे. जगभरातील वेगवेगळया देशांच्या राज्यघटनांमधून आपण आपल्याला योग्य ठरेल अशा तरतुदी घेतल्या आहेत. यापैकी संसदीय शासनपद्धती, कायद्याचे राज्य अशा पद्धती आधीच लागू होत्या त्या आपण तशाच ठेवल्या आणि लिखित राज्यघटना ,न्यायिक पुनर्विलोकन , राष्ट्रपतिनावरील महाभियोग अशा तरतुदी अमेरिकेकडून घेतल्या.

**S77. Ans.(b)**

**Sol.** घटना समितीत एकूण 15 महिला होत्या . 1) सरोजिनी नायडू, 2) सुचेता कृपलानी 3) विजयालक्ष्मी पंडित आणि 4) दुर्गाबाई देशमुख, 5) हंसा जिवराज मेहता, 6) राजकुमारी अमृत कौर, 7) अम्मू स्वामीनाथन, 8) दक्षिणयानी वलयूधन, अशी प्रसिद्ध नावे समाविष्ट होती. 9) कमला चौधरी, 10) लीला रॉय, 11) पौर्णिमा बनर्जी, 12) रेणुका रे, 13) मालती चौधरी, 14) ऍन मास्कारेन 15) बेगम आयजाज रसूल.

**S78. Ans.(c)**

**Sol.** भारतीय संविधानाच्या सुरुवातीला जी प्रास्ताविक आहे त्यामधील हे सगळे महत्वाचे शब्द आहेत. भारतीय संविधानाच्या उद्देशिकेप्रमाणे भारत हे सार्वभौम समाजवादी (Socialist), धर्मनिरपेक्ष (Secular), लोकशाही (Democratic) प्रजासत्ताक (Republic) आहे.हे संविधान नागरिकास

सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय आचार,विचार, धर्म, श्रद्धा यांचे स्वातंत्र्य आणि राजकीय समानता व समान संधी देण्याचे वचन देते.

मूळ उद्देशिकेत समाजवादी धर्मनिरपेक्ष व एकात्मता हे शब्द नव्हते. राज्यघटनेच्या ४२व्या दुरुस्तीद्वारे ते उद्देशिकेत घालण्यात आले.

**S79. Ans.(c)**

**Sol.** निवडणूक अयोग्य हि संविधानिक संस्था आहे. कलम 324 अनुसार तिची स्थापना होते.संविधानाने एकाच कमिशनर ची तरतूद केली होती. त्यात नंतर बदल करण्यात आला. निर्णय घेताना बहुमताने घेतला जाती त्यामुळे केवळ विधान क योग्य .

**S80. Ans.(d)**

**Sol.** राज्य लोकसेवा आयोगाचे सदस्य पुन्हा त्याच पदावर नियुक्त होऊ शकत नाहीत. पण शासनात इतर पदांसाठी ते विचार करू शकतात. इतर पदांसाठी बंधन नाही, म्हणून ब आणि क योग्य

**S81. Ans.(a)**

**Sol.** राज्यासाठीची मार्गदर्शक तत्त्वे तीन प्रणालींमध्ये विभागलेली आहेत. गांधीवादी , समाजवादी आणि पुरोगामी. महात्मा गांधी यांच्या विचारप्रणालीशी जुळणारी तत्त्वे जसे कि ग्राम विकास, नाश बंदी, प्राणी संवर्धन हि गांधीवादी तत्त्वे. गरिबांच्या उद्धाराची तत्त्वे हि समाजवादी त्यामुळे विधान ड हे तसे आहे. आणि भविष्याचा विचार करून वागणारी तत्वे विधान इ हे पुरोगामी आहे.

**S82. Ans.(a)**

**Sol.** मतदान करणे हे मूलभूत कर्तव्य असावे यावर चर्चा झाली होती परंतु मतदान न करणे हा हि अधिकार असल्याने त्याचा समावेश मूलभूत कर्तव्यात केलेला नाही.

**S83. Ans.(d)**

**Sol.** भारताने स्वतंत्र होताच पात्र नागरिकांना मतदानाचा हक्क दिलेला आहे. तो बजावता यावा , कुणी अडवल्यास कायदेशीर पाठबळ मिळावं म्हणून तो कायदेशीर अधिकार केलेला आहे.

**S84. Ans.(d)**

**Sol.** 73 व्या घटना दुरुस्ती मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी ऐच्छिक आणि अनिवार्य अशा दोन्ही प्रकारच्या तरतुदी आहेत. किमान व्हाव्या अशाच गोष्टी अनिवार्य आहेत. वरीलपैकी विधान C आणि D अनिवार्य मध्ये मोडत नाही.

**S85. Ans.(d)**

**Sol.** संसदेच्या दोन्ही सभागृहामध्ये मतभेद झाल्यास तोडगा काढता यावा म्हणून संविधानाने संयुक्त बैठकीची तरतूद केलेली आहे. परंतु यामध्ये सध्या बहुमताने विधेयके पारित होतात तसेच अशा बैठकीचे अध्यक्षस्थान भूषवायचा अधिकार लोकसभा अध्यक्षांना दिलेला आहे. ते नसताना किंवा कुठल्याही परिस्थितीत राज्यसभेचे अध्यक्ष संयुक्त बैठकीचे अध्यक्षस्थान भूषवू शकत नाहीत. त्यामुळे विधान B आणि D चूकीचे आहे.

**S86. Ans.(d)**

**Sol.**

एकूण कालावधी 10 तास ज्यामध्ये 5 तास 15 किलोमीटर प्रतितास वेगाने आणि 5 तास 45 किलोमीटर प्रतितास वेगाने प्रवास झाला.

अंतर = वेळ * वेग

पूर्वार्ध = 5*15=75

उत्तरार्ध = 5*45=225

75+225=300

**S87. Ans.(b)**

**Sol.** रविवारी सुरु होणाऱ्या 30 दिवसांच्या महिन्यात एकूण 5 रविवार आणि 4 शनिवार येतील.
म्हणजे 30 पैकी 9 दिवसात सरासरी 1200 पर्यटक येतात.
म्हणून शनिवार रविवारी येणाऱ्या एकूण पर्यटकांची संख्या 1200*9 = 10800
उरलेल्या 21 दिवसात येणारे पर्यटक 21*400= 8400
30 दिवसांची एकूण पर्यटक संख्या = 19200
सरासरी 19200/30=640

**S88. Ans.(d)**

**Sol.** दिलेल्या माहिती नुसार जर राष्ट्रीय बचत प्रमाण पत्रातील रक्कम क्ष मानली आणि सार्वजनिक भविष्य निधी मधील रक्कम य मानली
क्ष /3 = य /2
क्ष = 3 य / 2
एकूण रक्कम 5 लाख आहे
5,00,000 = य + क्ष
5,00,000 = य + 3 य / 2
10,00,000 =5य
म्हणून य = 200000
योग्य पर्याय (d)

**S89. Ans.(a)**

**Sol.** 600 मुलांसाठीचा अल्पोपहार 360 पुरुषांना पुरतो
दोन्ही संख्यांना 120 ने भागल्यास
5 मुलांचा अल्पोपहार 3 पुरुषांना पुरतो
120 मुलांना दिल्यानंतर आपल्याकडे 80 पाकिटे उरतील
5 गुणिले 16 =80
म्हणून 3 गुणिले 16 = 48 पुरुषांना अल्पोपहार पुरेल
योग्य पर्याय (a)

**S90. Ans.(c)**

**Sol.** उभ्या स्तंभाची बेरीज 24 होते
दुसऱ्या स्तंभात 9+1+6+8=24
तिसऱ्या स्तंभात 4+6+9+5=24
पहिल्या स्तंभात 24 पूर्ण होण्यासाठी 9 कमी पडत आहेत
म्हणून योग्य पर्याय (c)

**S91. Ans.(a)**

**Sol.** दुसऱ्या देशांनी केलं किंवा नाही हा तार्किक युक्तिवाद ठरत नाही त्यामुळे II येणार नाही.
I बरोबर आहे कारण लसीकरण हि शासनाचे जबाबदारी आहे आणि लोकांचं संरक्षण हे प्राथमिक कर्तव्य आहे. लोकसंख्या मोठी असल्याने अधिक धोका आहे म्हणूनमजबूत युक्तिवाद आहे.

**S92. Ans.(c)**
**Sol.** इंग्रजी वर्णाक्षरांच्या स्थानांचे क्रमांक पहिले तर शब्दाचा संकेत म्हणजे ते आकडेच आहे . SHOP मधील अक्षरांची स्थाने 19-8-15-16 अशी आहेत म्हणून पर्याय (c)

**S93. Ans.(b)**
**Sol.** पहिल्या दोन विधानानुसार मिता सगळयात मोठी त्यानंतर गीता आणि तिच्याहून लहान सीता असा क्रम लागतो. तो सत्य असेल तर सीता मीतापेक्षा मोठी असूच शकत नाही.

**S94. Ans.(d)**
**Sol.** सर्व पट्ट्या सरळ आहेत पण सर्व पिना पट्ट्या नाहीत त्यामुळे I नाही येणार
काही पिन पट्ट्या आहेत पण सर्व पट्ट्या पिन आहेत का हेही निश्चितपणे सांगता येणार नाही म्हणून पर्याय (d)

**S95. Ans.(b)**
**Sol.** मीराच्या सासऱ्यांची मुलगी म्हणजे तिची नणंद
नणंदेचा एकुलता एक भाऊ भणजे मीराचा नवरा. त्याची सासू म्हणजे मीराची आई.

**S96. Ans.(b)**
**Sol.** वाक्याचा अर्थ पाहता नियोजन करून घडवून आणल्याचे दिसते त्यामुळे षडयंत्र हा शब्द योग्य बसतो.

**S97. Ans.(b)**
**Sol.** ABCDEFGHIJKLM
ZYXWVUTSRQPON
अशी वर्णमालेची मांडणी केल्यास एक सोडून एक अक्षरांचा गट येतो. एकदा वरच्या ओळीतून आणि एकदा खालच्या उजवीकडेन डावीकडे गट पुढे सरकत जातो.

**S98. Ans.(b)**
**Sol.** प्रश्न विचारल्याप्रमाणे आधी स्वर आहे पण नंतर चिन्ह नाही असे दोनच स्वर आहेत.

$67B@CRAO&%DH&@ **OUG** I7$3#SJSFAJ^Q34UI$& **OES** SB*FL
1 2

**S99. Ans.(a)**
**Sol.** 84 दिवस पुढे मोजायचे आहेत. दर 7 दिवसांनी तोच वार येतो. आणि 84 ला 7 ने पूर्ण भाग जातो तर 84 व्य दिवशी सुद्धा मंगळवारच येईल.

**S100. Ans.(d)**
**Sol.** संख्यामालेत एकाच वेळी दोन साखळया आहेत ज्या एक आड एक बदलतात
पहिली - 3 + 4 = 7 + 4 = 11 + 4 ......
दुसरी 21-2 = 19-2 = 17-2 = 15 ....
पहिल्या साखळी नुसार नुसार उत्तर 19 + 4 = 23

